**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – शुभम रामचंद्र सायरे

वय – २४ वर्ष, व्यवसाय – खाजगी

राहणार – राय नगर, कन्हान, ता. पारशिवणी, जिल्हा – नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. दिनांक २४.०९.२०२२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता समन्स दिला होता. मी फिर्यादीच्या दुकानात काम करतो. पोलीसांनी मला फिर्यादीच्या दुकानातच समन्स दिला होता. तेथून मी पोलीसांसोबत घटनास्थळी पंचनाम्यासाठी गेलो होतो. आता मला समन्स दाखविला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. समन्सला **नि.क्र. ०६** देण्यात येते. पोलीसांनी घटनास्थळी माझ्या समक्ष पंचनामा तयार केला. तो वाचून त्यावर मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. तो तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.क्र.०७** देण्यात येते.

सरतपास पूर्ण

**उलटतपास आरोपीचे वकील कु. गणवीर यांच्यातर्फे**

२. फिर्यादीचे दुकानापासून घटनास्थळ दोन ते तीन मिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीच्या दुकानातून घटनास्थळ दिसते. हे म्हणणे खरे आहे की घटना माझ्या समक्ष घडली होती. फिर्यादी हे गणेश नगर कन्हान येथे राहतात व फिर्यादीचे दुकान (पानठेला) राय नगर येथे मारूती किराणा स्टोर्सच्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की मनसरकडे जाताना फिर्यादीचा पानठेला रस्त्याच्या डाव्या बाजुला आहे व गणेश नगर उजव्या बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की घटना चौफुल्यावर घडली आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळी ट्राफीक पोलीस नसतात. हे म्हणणे खरे आहे की आरोपी नागपूर वरून मनसर कडे दुचाकीने जात होता. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी त्यांच्या पत्नी व मुलीसोबत त्यांच्या दुचाकीने रायनगर कडून गणेश नगर येथे रॅग साईडने जात होते. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी फिर्यादी त्यांच्या दुचाकीने ट्रिपल सिट जात होते. हे म्हणणे खरे नाही की वळन घेत असताना फिर्यादीची पडली व त्यामुळे फिर्यादी, त्याची पत्नी व मुलगी यांना दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी आरोपीने फिर्यादी, त्याची पत्नी व मुलगी यांना दवाखान्यात नेले. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीने आरोपी विरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी

सं.फौ.ख.क्र.६२/२०२३



सरकार वि. निखील

निशाणी क्र. ०५

माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी माझे मालक असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की सरतपासात सांगितल्याप्रमाणे काही घडले नाही.

उलटतपास पूर्ण

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–

ठिकाण –कामठी **(रा.र. शेरेकर)**

दिनांक –३०/१२/२०२३ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.